**आजचा सुविचार**

काळा रंग हा अशुभ समजला जातो.
पण प्रत्येक काळा रंगाचा
फळा हा अनेक विद्यार्थांचे
आयुष्य उजलवत असतो...

# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनेल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २५४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२६ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## घरात घुसून सासूसमोर सुनेला संपवलं



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, छत्रपती संभाजीनगर :** वाळूज महानगरातील साईश्रद्धा पार्क सोसायटीत शिरून महिलेचा निर्घृण खून करणाऱ्या आरोपी महिलेला गुरुवार २३ एप्रिल रोजी न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. यावेळी पोलिसांनी आरोपी महिला शैला सोनार हिची चौकशी केली असता तपास कामात पोलिसांना सहकार्य करीत नसल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. त्यामुळे खुनाचे कारण गुलदस्त्यातच असून, खरे कारण पोलिसांच्या पुढील तपासात निष्पन्न होण्याची शक्यता आहे.

**पैशांच्या वादातून घरात घुसून महिलेची हत्या**

साधना सोनपेठकर यांचा शैला सोनार या महिलेने जुन्या पैशांच्या वादातून चाकूने भोसकून खून केल्याची घटना बुधवारी सकाळी घडली आहे. यावेळी शैला सोनारने बंदुकीचा धाक दाखवून सोनपेठकर यांच्या गळ्यावर पोटावर चाकूने वार केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. यावेळी शैला हिनेसुद्धा स्वतःच्या हातावर चाकू मारून जखमी करून घेतल्याने तिच्यावर घाटी रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. घटना घडली त्यावेळी घरात सोनपेठकर यांच्या सासू केसरबाई या होत्या. त्यांच्यासमोरच दोघींची झटपट झाली. त्यावेळी शैला हिने चाकूचे वार करून साधना यांना संपवले.

**दोघांमध्ये अनेकवेळा आर्थिक व्यवहार**

घराचा दरवाजा आतून बंद करून खुनी महिलेने 'तुमच्या मुलाकडून पैसे घ्यायचे आहेत', असे म्हणून वाद घातला. त्यानंतर जवळपास अर्धा तास खुनी हल्ल्याचा थरार केसरबाई यांनी अनुभवला. यावेळी खून करून आरोपी महिला तेथेच फोनवर बोलत बसली होती. पोलिसांनी दरवाजा तोडून घरात प्रवेश करून तिला ताब्यात घेतले होते. शैला सोनार व महेंद्र सोनपेठकर यांची २००९ या वर्षी एका कंपनीत ओळख झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये अनेकवेळा आर्थिक व्यवहार झाले आहे. त्यानंतर २०२४ मध्ये महेंद्रविरुद्ध पैशांच्या वादातून बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. या दोघांमध्ये वारंवार पैसे मागत असल्याने वाद झाला असून, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या वादात आरोपी महिलेने लाखो रुपये उकळले असल्याचा संशय आहे.

## रेल्वे स्थानकावर महिलांच्या संशयास्पद हालचाली

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, सोलापूर :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) मोठी कारवाई करत मुंबई–सोलापूर सिद्धेश्वर एक्स्प्रेस या गाडीत होणारा दरोड्याचा प्रयत्न हाणून पाडला आहे. महिलांची एक टोळी रेल्वे गाडीत दरोड्याच्या तयारीत होती, मात्र आरपीएफ पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला आहे. एकूण नऊ महिला संशयित आरोपींना अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर क्राईम प्रिव्हेन्शन अँड डिटेक्शन स्क्वॉड (सीपीडीएस) पथकाचे हेड कॉन्स्टेबल शिवाजी मुंडे यांनी तीन महिलांना संशयास्पद अवस्थेत फिरताना पाहिले. त्यांच्याकडे चौकशी करून त्यांना रेल्वे स्थानक सोडण्यास सांगितले होते. मात्र संशयित महिलांची टोळी लातूर एक्स्प्रेसमध्ये चढली होती. त्यामुळे कुर्डुवाडी आरपीएफने सोलापूर आरपीएफ विभागाला सतर्कतेचा इशारा दिला होता.

संशयित महिलांची टोळी जेऊर स्थानकावर उतरून दरोड्याच्या उद्देशाने मुंबई–सोलापूर सिद्धेश्वर एक्स्प्रेसमध्ये चढली. सतर्क असलेल्या आरपीएफने तत्काळ कारवाई केली. सिद्धेश्वर एक्स्प्रेसमधील एस्कॉर्टिंग पथकातील हेड कॉन्स्टेबल हरमेंद्र प्रसाद मीना आणि कॉन्स्टेबल ब्रजेश यादव यांना सतत माहिती देण्यात येत होती. संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांचे फोटो आणि प्रवाशांकडून मिळालेल्या माहितीद्वारे देखरेख करण्यात आली. सोलापूर स्थानकावर कॉन्स्टेबल सोनम पठाण यांच्यासह आरपीएफची विशेष टीम सज्ज होती. रेल्वे स्थानकावर पोहोचताच सर्व महिला आरोपींना ताब्यात घेतले. या महिला १८ ते ४० वयोगटातील असून धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

## उन्हाच्या काहिलीचा कहर! राज्यात उष्णतेच्या झळा कायम राहण्याचा अंदाज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** मुंबईसह ठाणे, पालघर जिल्ह्यांत उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून महामुंबई परिसरात तर पाऱ्याने चाळिशी पार केली आहे. कल्याण, डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, कर्जत परिसरात शुक्रवारी ४१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. मुंबईकरही उष्णतेने हैराण झाले. येथे तुरळक ठिकाणी कमाल तापमानाचा पारा ३६ अंशांवर पोहोचला होता. सांताक्रूझ येथे ३५.६, तर कुलाबा येथे ३३ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. उष्णतेची तीव्रता आज, शनिवारीही कायम राहील, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मुंबईत वातावरणामध्ये उष्णता साचून राहिल्याने नागरिकांना अस्वस्थता जाणवत होती. येथे किमान तापमानाचा पाराही चढा होता. कुलाबा येथे २६.५, सांताक्रूझ येथे २६.१ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदवण्यात आले आहे. सांताक्रूझ येथील किमान तापमान सरासरीपेक्षा १.२ अंशांनी अधिक असल्याचे निदर्शनास आले.



**मुंबईतील शुक्रवारचे कमाल तापमान (अंश सेल्सिअस)**
**राममंदिर :** ३६.८
**विक्रोळी :** ३६.६
**विद्याविहार :** ३५.९
**चेंबूर :** ३५.४
**वांद्रे आणि दहिसर :** ३५.१

कर्जत, मुरबाड, कल्याण, डोंबिवली, भिवंडी आदी परिसरात उष्णतेचा पारा अधिक आहे. गुरुवारी कल्याण, डोंबिवली, भिवंडी, बदलापूर, कर्जत परिसरात ४३ अंश कमाल तापमानाची नोंद झाली होती. शुक्रवारी यापेक्षा किंचित कमी तापमान नोंदवण्यात आले. आज, शनिवारी पुन्हा तापमान वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान अभ्यासक अभिजीत मोडक यांनी दिली.

**नाशिकमध्ये विक्रमी किमान तापमान**

नाशिक : नाशिक जिल्ह्यात हंगामातील विक्रमी किमान तापमानाची शुक्रवारी नोंद झाली. हे तापमान २४.३ अंश सेल्सियस नोंदविले गेले. गारवा गायब झाल्याचा आणि सकाळपासूनच उकाडा जाणवत असल्याचा प्रत्यय नाशिककरांना येत आहे. कमाल तापमानही ३९.६ अंश सेल्सियस नोंदविले गेले. जळगावचे तापमान ४३.३ अंशांवर पोहोचले असून, मालेगाव आणि छत्रपती संभाजीनगरचे तापमान ४१.६ अंश सेल्सियस नोंदविण्यात आले आहे.

**जळगावात उष्माघाताने मृत्यू**

जळगाव : जळगाव जिल्ह्यात कमाल तापमानाचा पारा ४२.८ अंशांपर्यंत पोहोचला आहे. ही होरपळ आता कष्टकऱ्यांच्या जिवावर बेतू लागली आहे. रावेर शहरातील एका बांधकाम कामगाराचा गुरुवारी मध्यरात्री मृत्यू झाला असून, उष्माघातामुळे त्याचा बळी गेल्याचा प्राथमिक अंदाज वैद्यकीय सूत्रांनी वर्तवला आहे. योगेश सुधाकर महाजन असे या कामगाराचे नाव आहे.

**कोकणालाही झळा!**

मुंबईसोबतच कोकण विभागातील कमाल तापमानाचा पारा चढा आहे. रत्नागिरी येथे ३६.३, तर डहाणू येथे ३५.६ अंश सेल्सिअस कमाल तापमान शुक्रवारी नोंदले गेले. उष्णता निर्देशांकाच्या आकडेवारीनुसार, कोकण किनारपट्टीवर, तसेच मुंबईतील कमाल तापमानाची जाणीव ही ४० अंशांच्या पार होती, असे दिसले. महाराष्ट्राच्या अंतर्भागात तुरळक ठिकाणी कमाल तापमानाची जाणीव ही ४० अंशांहून कमी होती, अशीही नोंद झाली. परंतु विदर्भ, कोकण किनारपट्टी येथे मात्र ही जाणीव अधिक तीव्र असल्याचे निदर्शनास आले.

## दिवसाला २५ हजार; त्र्यंबकेश्वर दर्शनाच्या काळ्याबाजाराचे 'कलेक्शन' उघड

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नाशिक :** त्र्यंबकेश्वर मंदिरात 'व्हीआयपी' दर्शनासाठी होणाऱ्या आर्थिक लुटीत संशयित विश्वस्त पुरुषोत्तम कडलग याच्यासह चौघांना न्यायालयीन कोठडी सुनावल्याने त्यांची रवानगी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात झाली आहे. या प्रकरणात आणखी एक मध्यस्थ वसंत उर्फ नारायण कचरू मुर्तडक (वय २६) याला त्र्यंबकेश्वर पोलिसांनी अटक केली आहे. त्याला न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून, त्याच्यामार्फत कडलगला प्रतिदिवस पंचवीस हजारांहून अधिक 'कलेक्शन' मिळत असल्याचे उघड झाले आहे.

पंचवटीतील ४६ वर्षीय आनंदा सुरेश मेहेंदळे यांनी त्र्यंबकेश्वर पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार संशयित गोटीराम मनाजी पेहरे, अभिषेक कडलग, ओम कडलग आणि पुरुषोत्तम मधुकर कडलग या चौघांविरुद्ध गुन्हा नोंद आहे. या चारही संशयितांना शुक्रवारी (दि. २४) न्यायालयात हजर करण्यात आले. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस. व्ही. लाड यांच्या न्यायकक्षात सुनावणी झाली. पोलिस निरीक्षक महेश कुलकर्णी यांनी तपासातील मुद्दे स्पष्ट केले. अभियोग कक्षाच्या सहाय्यक संचालक किरण बेंडभर व सहाय्यक अभियोक्ता सायली गोखले यांनी युक्तिवाद केला. कडलगच्या बाजूने वकील राहुल कासलीवाल यांनी जोरदार युक्तिवाद केला.

दरम्यान, दर्शन रांगेत ताटकळत उभ्या भाविकांसोबत मध्यस्थ संपर्क साधत जलद दर्शनासाठी किंमत निश्चित करतात. त्यानंतर मध्यस्थ हे संशयित पुरुषोत्तम कडलग, अभिषेक कडलग, ओम कडलग यांच्याशी संपर्क साधत भाविकांना त्यांच्यासोबत मंदिरात पाठवतात.




**मुर्तडक टोळीचा म्होरक्या**

संशयित मुर्तडक हा टोळीचा प्रमुख मध्यस्थ होता. त्याचे सात साथीदार देशभरातील भाविकांशी संपर्क साधत अवघ्या पंधरा मिनिटांत 'व्हीआयपी दर्शन' करून देण्याचे आमिष दाखवायचे. त्यासाठी प्रत्येक भाविकाकडून किमान तीन तर जास्तीत जास्त बारा हजार रुपये उकळले जायचे. धक्कादायक म्हणजे, मुर्तडकमार्फत प्रतिदिवस पंचवीस ते अठ्ठावीस हजार किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम कडलगपर्यंत पोहोचवली जायची. मुर्तडकच्या बँक खात्यातून कडलगसह इतर संशयितांच्या बँक खात्यात सहाशेपेक्षा जास्त वेळा आर्थिक व्यवहार झाल्याच्या नोंदी न्यायालयात सादर करण्यात आल्या.

## गोंडपिपरीत एमआयडीसी विरोधात शेतकऱ्यांचा एल्गार !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** गोंडपिपरी तालुक्यातील प्रस्तावित एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राविरोधात गुरुवारी दि. २३ एप्रिल २०२६ रोजी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी अभूतपूर्व व आक्रमक आंदोलन छेडत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

करंजी, वढोली, चेक पेल्लूर, वडकूली, चकवडकुली, सिरसी, देऊळवार, चक बेरडी, बोरगाव, धानापूर, चेक बोरगाव, लिखितवाडा, व खरारपेठ या १२ गावातील हजारो शेतकरी, शेतमजूर, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. यावेळी आंदोलकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर जोरदार टीका करत 'शेतकऱ्यांच्या हिताचा बळी देऊन उद्योगपतींचे हित जपले जात आहे' असा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री, उद्योगमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की, 'जमीन हिरावून घेण्याचा कुठलाही डाव सहन केला जाणार नाही.' प्रस्तावित प्रकल्पामुळे सुपिक शेती जमीन नष्ट होणार, जलस्त्रोतांवर प्रचंड ताण येणार, तसेच पर्यावरणीय प्रदुषण व मोठ्या प्रमाणावर विस्थापनाचा धोका निर्माण होणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी ठामपणे मांडले. याशिवाय, भूसंपादन प्रक्रियेत आवश्यक असलेल्या सामाजिक व पर्यावरणीय परिणाम अहवालात पारदर्शकतेचा अभाव असून, सार्वजनिक सुनावणी केवळ औपचारिकतेपुरती असल्याचा आरोपही करण्यात आला. 'आमची संमती न घेता जमीन घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. हा आमच्या मुलभूत हक्कांवर थेट आघात आहे,' असा संतप्त सूर आंदोलकांनी लावला. 'मोबदला नको, पण जमीनही देणार नाही,' अशी भूमिका घेत शेतकऱ्यांनी प्रशासनाला थेट आव्हान दिले. गोंडपिपरी औद्योगिक संघर्ष कृती समितीच्या नेतृत्वाखाली आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. जोपर्यंत एमआयडीसी प्रकल्प पूर्णपणे रद्द होत नाही, तोपर्यंत आंदोलन अधिक उग्र स्वरुप धारण करेल, असा निर्धार समितीने व्यक्त केला. 'आपली शेती, आपला हक्क' या घोषणांनी परिसर दणाणून गेला असून, प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास येत्या काळात रास्ता रोको, बंद व जिल्हास्तरीय आंदोलनाची तयारी सुरु असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.



यावेळी गोंडपिपरी तालुका औद्योगिक क्षेत्र संघर्ष कृती समितीचे पदाधिकारी तसेच १२ गावातील महिला, पुरुष, तरुण–तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर आंदोलनात समितीचे राजू झाडे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत ठाम भूमिका मांडली, ते म्हणाले, 'शेतकऱ्यांच्या जमिनीवर कुणाचाही जबरगस्तीने हक्क चालणार नाही, ही लढाई आपल्या अस्तित्वाची आहे.' तसेच त्यांनी इशारा देताना म्हटले , एकजूट ठेवून संघर्ष केल्यास कोणताही अन्याय रोखता येतो. त्यामुळे शेवटपर्यंत लढा सुरुच राहिल.' यावेळी संजय वडस्कर म्हणाले, 'शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारा कोणताही प्रकल्प आम्ही कदापि मान्य करणार नाही.' तसेच सुरज माडूरवार यांनीही ठाम भूमिका मांडत सांगितले की, 'ही लढाई केवळ जमिनीची नाही, तर आपल्या पुढच्या पिढ्यांच्या भवितव्याची आहे.' यावेळी मंचावर समितीचे सदस्य कल्पेश खरबनकर, अमित भसारकर, योगेश कोरवते, अनुप कुंभारे, संतोष निकोडे, राजू सूरकर, रामराव पेंदोर, देवराव मडावी, प्रदिप खोब्रागडे, अजय माडूरवार, सुदर्शन कोवे, रामदास मशाखेत्री, भास्कर चौधरी, हरी मडावी, शंकर पाल, संदेश निमगडे, मुर्लीधर लाटकर, निलेश तिवडे, प्रफुल आलम, मारोती जुआरे, तुळशीदास बारसागडे, आशुतोष भसारकर, सुनील मेश्राम, अकित चुदरी, गजानन धंदरे आदींची उपस्थिती होती. तर तालुक्यातून शेकडोच्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.




## मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात. मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, ॲक्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात. गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात.

आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत देखील सीबीएएससीचा अभ्यासक्रम शिकवला जात आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळत आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे. अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे.

**- श्याम ठाणेदार**

# संजय 'ऊवाच'




शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांची ओळख म्हणजे खालच्या पातळीवर जाऊन भाषा वापरणारे वाचाळविर. हे महाशय बुलढाणा विधानसभेचे प्रतिनिधित्व करतात आणि ज्या विधी मंडळात कायदे बनतात त्या पवित्र लोकशाहीच्या पवित्र मंदिरात बसतात पण नेमके काय करतात तर तिथेच असलेल्या मंत्रालयातील कँटीन मधे टॉवेलवर येऊन कँटीन कर्मचाऱ्याला बुक्क्यांचा मार देतात ऐवढेच नव्हे तर अर्वाच्य भाषा वापरतात कधी ते राहुल गांधी यांई जीभ छाटुन आणणाऱ्याला लाखो रूपयांचे बक्षीस जाहीर करतात तर कोरोना काळात सध्या राज्यासह देशभर कोरोनामुळे हाहाकार उडाला आहे. पण विरोधी पक्ष मदत करायचे सोडून राजकारण करत आहेत. मला जर कोरोनाचा विषाणू मिळाला तर देवेंद्र फडणवीसांच्या तोंडात कोंबेन. असे म्हणत आपल्या अकलेचे तारे तोडतात. २०२४ मधे शिवजयंती मिरवणुकीत एका तरुणाला मारहाण करतांनाचा त्यांचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. पोलिस बदलाबाबत वादग्रस्त वक्तव्य करतांना महाराष्ट्र पोलिसांसारखं अकार्यक्षम डिपार्टमेंट जगात कुठेही नाही. पोलिसांनी जर ५० लाख पकडले तर ते ५० हजार दाखवतात. गुटखाबंदी केली की पोलिसांचा एक हप्ता वाढतो, दारूबंदी केली की पोलिसांचा एक हप्ता वाढतो, असे म्हणत पोलिस दलाला लक्ष केले होते, मतदारांना फक्त दारू आणि मटण पाहिजे हे दोन हजारात विकले जातात,यांच्यापेक्षा वेश्या बऱ्या असं म्हणत त्यांनी निवडुन येण्याचे गुपित ऊघड केले होते. २०२५ मधे त्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या बाबत देखील वादग्रस्त वक्तव्य केले होते.त्याच प्रमाणे मी वाघाची शिकार केली होती आणि त्याचे दात गळ्यात घालून फिरतो असा दावा त्यांनी केला होता. तसेच त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि जिजामातांबद्दलही अपशब्द वापरले. यापलिकडे त्यांचे कर्तृत्व शुन्य.ते कधीही चाल चलन चरित्र कि राजनिती करणारे लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जात नाही तर एक दबंग राजकारणी अशीच त्यांची ओळख आहे. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती समोर येत आहे ते नववी नापास आहे. अर्थात राजकारणात ना शैक्षणिक पात्रता लागते ना इतर पात्रतेची गरज असते. मात्र कुठे चौथी पास असलेले कै. वसंतदादा पाटील आणि कुठे हे वाचाळविर.

अर्थात संजय गायकवाड हे एकटेच असभ्य भाषा बोलणारे एकटे नाहीत तर पक्षभेद पलकडे जाऊन जवळपास सर्वच पक्षात असे वाचाळविर आहेत ज्यांच्या वक्तव्यांनी समाजात तेढ निर्माण होते मात्र सोयीनुसार भुमिका घेत कोणावर तोंडदेखलेपणाने कारवाई होते तर कोणाला वाचविले देखील जाते. केवळ राजकीय नेते च नाही तर अनेक बुवा, महाराज, हे देखील विद्वेषी भाषा करण्यात मागे नाही. लोकप्रतिनिधीं हे समाजाला दिशा दाखवतात, त्यामुळे मोठ्या अपेक्षेने आणि विश्वासाने जनता त्यांच्या हाती राज्यव्यवस्था सोपवते मात्र हेच नेते बेलगामपणे वागतात बोलतात आणि त्यांचे अनुकरण त्यांचे अनुयायी, कार्यकर्ते करतात. कारवाया बाबत शासन-प्रशासन, पोलिस यंत्रणा देखील आरोपी बघुन कारवाई करतात हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. संजय गायकवाड यांनी इतकी गरळ ओकुन, महिलांबाबत अक्षम्य भाषा वापरुन देखील पोलिस यंत्रणा साधी तक्रार दाखल करून घेण्यात कुचराई करत होती कि तर म्हणे आम्हाला राज्याच्या विधिज्ञ अधिवक्त्याकडुन कायदेशीर सल्ला घ्यावा लागेल. यानंतर अखेर तक्रार दाखल केली ती देखील जामीनपात्र गुन्ह्याचे कलमे लावुन. आता ऊपरती झाली म्हणून अखेर संजय गायकवाड यांनी दिलगीरी व्यक्त केली आहे मात्र ऐवढ्यावरच थांबता नये. कठोर कायदेशीर कारवाई व्हायला हवी, म्हातारी मेल्याचे दुखः नाही पण काळ सोकावता कामा नये. विशेष नवल वाटते ते अशा महाभागांना निवडुन देणाऱ्या मतदारांचे आणि त्यांना तिकिट देऊन पाठिशी घालणाऱ्या पक्षांचे. चांगले चाल चलन चरित्र वाले ऊमेदवार पक्षांना का मिळु नये?.




**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

# काही माणसं मार्ग बदलतात; तर काही मार्ग माणसं बदलतात!

माणसाचं आयुष्य म्हणजे सरळ रेषेतली वाट नसते. ती वळणांनी, चढ-उतारांनी, काटेरी वळचणींनी भरलेली असते. कुणी त्या वाटेवर चालताना स्वतःचा मार्ग बदलतो; तर कुणाचं संपूर्ण व्यक्तिमत्त्वच त्या मार्गामुळे बदलून जातं. म्हणूनच जीवनाचं एक कटू पण खरं सत्य असं सांगतं, काही माणसं मार्ग बदलतात; तर काही मार्ग माणसं बदलतात. हा फरक समजून घेतला, तर माणसाचं आयुष्यही समजायला लागतं. काही माणसं परिस्थितीवर मात करतात. संकट आलं, अडथळे आले, अपयश आलं तरी ते थांबत नाहीत. ते विचार करतात, आत्मपरीक्षण करतात आणि म्हणतात, हा मार्ग माझ्यासाठी योग्य नाही; मला दुसरी वाट शोधायची आहे. ही माणसं पळपुटी नसतात; ती प्रगल्भ असतात. कारण मार्ग बदलणं म्हणजे हार मानणं नव्हे, तर स्वतःला वाचवणं असतं. स्वतःच्या मूल्यांशी, स्वप्नांशी आणि अंतःकरणाशी प्रामाणिक राहण्यासाठी घेतलेला तो एक धाडसी निर्णय असतो.

इतिहासात अशी असंख्य उदाहरणं आहेत. अपयशातून उभे राहिलेले उद्योजक, अन्यायाला कंटाळून व्यवस्थेविरुद्ध उभे ठाकलेले समाजसुधारक, चुकीच्या वाटेवरून परत फिरलेले सामान्य माणूस या सगळ्यांनी मार्ग बदलला; पण स्वतःला हरवू दिलं नाही. पण प्रत्येकाला मार्ग बदलता येतोच असं नाही. सगळ्यांकडे पर्याय नसतात. सगळ्यांकडे बळ नसतं. सगळ्यांकडे पाठिंबा नसतो. मग काही माणसं मार्ग बदलत नाहीत; मार्गच त्यांना बदलून टाकतो. दारिद्र्य, बेरोजगारी, सामाजिक अन्याय, कौटुंबिक जबाबदाऱ्या, व्यसन, सत्ता, पैसा हे सगळे मार्ग माणसाच्या आयुष्यावर आपला ठसा उमटवतात. एक संवेदनशील माणूस हळूहळू कठोर होतो. एक प्रामाणिक माणूस तडजोडी शिकतो. एक आदर्शवादी माणूस वास्तववादी बनतो, कधी कधी तर निराशावादीही. हा बदल नेहमी स्वेच्छेने होत नाही; तो अनेकदा परिस्थितीने लादलेला असतो. मार्ग माणसाला कधी मोडतो, तर कधी घडवतो. प्रत्येक मार्ग वाईट नसतो. काही मार्ग माणसाला मजबूत करतात.

संघर्षाची वाट चाललेला माणूस सहनशील होतो. अपमान सहन केलेला माणूस संवेदनशील होतो. कठीण परिस्थितीत तग धरलेला माणूस नेतृत्व शिकतो पण काही मार्ग माणसाला आतून तोडतात. निरंतर अपमान, अन्याय, उपेक्षा, असुरक्षितता यामुळे माणूस स्वतःवरच विश्वास ठेवणं सोडतो. मग तो जगण्यासाठी बदलतो; पण तो बदल त्याचा नसतो, तर तो लादलेला असतो. आजचा समाज कोणते मार्ग तयार करतोय? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आजचा समाज माणसाला कोणत्या वाटेवर ढकलतो आहे? स्पर्धेची वाट, जिथे माणूस माणसाचा प्रतिस्पर्धी आहे. स्वार्थाची वाट, जिथे मी केंद्रस्थानी आहे. दिखाव्याची वाट, जिथे सत्यापेक्षा प्रतिमा महत्त्वाची आहे. तडजोडीची वाट, जिथे मूल्यांपेक्षा सोयी जड ठरतात. या वाटांवर चालताना अनेक माणसं नकळत बदलून जातात. ते स्वतःला ओळखू शकत नाहीत. आरशात दिसणारा चेहरा त्यांचाच असतो; पण आतला माणूस कुठेतरी मागे पडलेला असतो.






**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

मार्ग बदलणं ही ताकद आहे, कमकुवतपणा नाही. समाज अनेकदा मार्ग बदलणाऱ्याला दोष देतो. स्थिर नाही, कायम बदलतो, टिकाव नाही अशी लेबले लावली जातात पण सत्य असं आहे की चुकीच्या मार्गावर ठाम राहणं हे धैर्य नाही; ते हट्ट आहे. वेळीच वळण न घेणं म्हणजे अपघाताला आमंत्रण देणं. मार्ग बदलणं म्हणजे स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी स्वीकारणं. ते धाडस सगळ्यांकडे नसतं. शेवटी प्रश्न मार्गाचा नाही, माणसाचा आहे. मार्ग बदलणं की मार्गाने बदलणं हा शेवटी निवडीचा प्रश्न आहे. माणूस जागरूक असेल, आत्मभान जपेल, प्रश्न विचारेल, तर तो मार्ग बदलू शकतो. पण जर तो गप्प राहिला, सवयींचा गुलाम झाला, तर मार्ग त्याला बदलतो कधी नकळत, कधी निर्दयपणे. म्हणूनच प्रत्येक वळणावर थांबून स्वतःला विचारणं गरजेचं आहे. हा मार्ग मला घडवतोय की मोडतोय? मी बदलतोय कारण मला वाढायचं आहे, की कारण मला तग धरायचा आहे?

आयुष्याच्या वाटेवर चालताना सगळ्यांनाच वळणं येतात. कोणी त्या वळणावर दिशा बदलतो, तर कोणी तिथेच स्वतः बदलून जातो. पण ज्यांनी स्वतःची ओळख जपली, मूल्यांना धरून ठेवलं आणि गरज पडल्यावर मार्ग बदलण्याचं धैर्य केलं, तेच खऱ्या अर्थाने जिंकतात. कारण शेवटी एवढंच खरं आहे की, मार्ग सगळ्यांनाच बदलतो; पण स्वतःला हरवू न देता मार्ग बदलणं, हीच खरी माणूसपणाची कसोटी आहे.

## एल्गार छेडा

चिखलारूतला गाडा
बाहेर कसा काढावा
छळू लागली समस्या
तो कसापुढे ओढावा

नवस बोलावा कुणा
कोणत्या देवा चढावा
देव का माणूस मोठा
हात कुणांस जोडावा

छिन्न विछिन्न संसारा
कुठे कशांने जोडावा
संधी साधू नेत्या वाटे
रे पाहुणचार झोडावा

फसवू लागे सारीपाट
कोणता डाव लढावा
आलेअडचणीतराज्य
प्यादाकुठला धाडावा

सभ्यविचार सोडवेना
कायदा कसा मोडावा
संहिता मला मोडवेना
नियमकोणतातोडावा

बरसू लागी आश्वासने
विश्वास कसा सोडावा
शांतपणा हो बुळेपणा
एल्गार त्वरित छेडावा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# परभणी महानगरपालिकेच्या सर्व ११ सभापतींची बिनविरोध निवड; ८ महिला सभापतींना संधी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, परभणी :** परभणी शहर महानगरपालिकेच्या विविध समित्यांच्या सभापती पदांसाठी निवड प्रक्रिया दि. २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता बी. रघुनाथ सभागृह येथे पार पडली. या निवड प्रक्रियेत सर्व ११ समित्यांच्या सभापतींची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निर्वाचन अधिकाऱ्यांनी केली.

या वेळी पिठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, नगरपालिका प्रशासन प्रमुख महेश गायकवाड, नगरसचिव विकास रत्नपारखे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा व उपमहापौर गणेश देशमुख यांच्या उपस्थितीत स्थायी समिती सभापतीपदी श्रीमती प्रतिभा अतुल सरोदे (तात्या) यांची निवड करण्यात आली. तसेच प्रभाग समिती अ सभापतीपदी रईसखान सरफराज खान, प्रभाग समिती ब सभापतीपदी मुसद्दीकखान नुरुल्ला खान, तर प्रभाग समिती क सभापतीपदी श्रीमती तबस्सुम वसीम शेख यांची निवड झाली.



इतर समित्यांमध्ये गलिच्छ वस्ती निर्मूलन, घरबांधणी व समाज कल्याण समिती सभापती म्हणून राजेश शंकरराव रणखांबे, महिला व बालकल्याण समिती सभापती म्हणून श्रीमती अश्विनी अमोल जाधव, स्थापत्य समिती सभापती म्हणून श्रीमती सायरा बेगम अलीमोद्दीन, वैद्यकीय व सहाय्य आरोग्य समिती सभापती म्हणून श्रीमती अबोली अनिल कांबळे, विधी व महसूल वाढ समिती सभापती म्हणून श्रीमती रुखसाना बेगम सय्यद अब्दुल हमीद जागीरदार, शहर सुधार समिती सभापती म्हणून श्रीमती शुभांगी शुभम पाष्टे, तसेच माध्यमिक, पूर्वमाध्यमिक व तांत्रिक समिती सभापती म्हणून श्रीमती शमशाद बेगम सय्यद इलाही यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित सभापतींचा जिल्हाधिकारी चव्हाण, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, महापौर सय्यद इकबाल व उपमहापौर गणेश देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी नूतन स्थायी समिती सभापतींनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केले. खासदार संजय जाधव, आमदार राहुल पाटील, गटनेते दिलीप ठाकूर आदींच्या सहकार्याने पदभार स्वीकारण्यात आला.

नवनिर्वाचित सभापतींनी शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी डॉ.विवेक नावंदर, दिलीप ठाकूर, गुलमीर खान, विजय जामकर, समाजसेवक सय्यद खादर, माजी उपमहापौर भगवान वाघमारे आदींनी नवनिर्वाचित सभापतींना शुभेच्छा दिल्या.

विशेष म्हणजे, ११ पैकी ८ सभापती महिला निवडून आल्याने महिलांना नेतृत्वाची मोठी संधी मिळाल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करणार - मुख्यमंत्री

## 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शुभारंभ; जलसंवर्धनाचा जागर करत अहिल्यादेवींना अनोखी मानवंदना

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, मुंबई :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे झाला. नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पीठाधीश गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वेदात नदीचे महात्म्य वर्णन केले असून नदीला आई मानले आहे. नदी स्तुती सुक्तात ऋषीमुनींनी नदीच्या उपयुक्ततेचे वर्णन केले आहे. वारशाचे संवर्धन आणि विकास याचा समन्वय देशाच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच अहिल्यादेवींच्या विचारांच्या आधारे भविष्यातील विकासाची दिशा दाखवण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गोदावरी नदी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेशासाठी महत्वाची असल्याने ती बारमाही प्रवाहित राहावी यासाठीदेखील प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जलव्यवस्थापनातील योगदानाचे स्मरण केले. ते म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी घाट, बारव यांची निर्मिती करताना अध्यात्मिकता आणि उपयुक्तता याचा समन्वय साधला. पाण्याचे महत्व लक्षात घेऊन जलव्यवस्थापनावर भर दिला. त्यांनी निर्माण केलेले बारव आजही सुस्थितीत असून त्याचे संवर्धन राज्य शासन करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अहिल्यादेवी होळकर यांनी नद्यांचे महत्व जाणले आणि नदी प्रदूषण रोखण्याचे प्रयत्न केले. महिला, गरीब आदिवासींना समाजाच्या मुख्य धारेत आणण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे विचार आजही महत्वाचे आणि मार्गदर्शक असून छत्रपती शिवाजी महाराज आणि अहिल्यादेवी यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांच्या आधारेच शाश्वत विकास साधता येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्री विखे-पाटील म्हणाले, त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून दोन यात्रा सुरू होत असून मध्य प्रदेशातील महेश्वर येथे नर्मदातीरी समारोप होणार आहे. राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून नर्मदेला अर्पण करण्यात येईल. गोदावरी आणि नर्मदेचे महात्म्य लक्षात घेऊन आणि विचार, वारसा आणि विकास ही त्रिसूत्री घेऊन यात्रेच्या माध्यमातून जलसंवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी केलेले जलसंवर्धनाचे कार्य जनतेत रुजविण्याचा प्रयत्न या यात्रेद्वारे करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनी या यात्रेत सहकार्य करावे, असे आवाहनही मंत्री विखे-पाटील यांनी केले.

आण्णासाहेब मोरे म्हणाले, जलसाक्षरतेचे विचार सेवेकऱ्यांना मार्फत पोहोचविण्यात येत आहेत. गुरुपीठाच्या माध्यमातून नदी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत. देशाच्या विकासासाठी थोरामोठ्यांचे विचार भारतभर पोहोचविण्याचे काम करावे लागतील. संस्कृती, संस्कार केले तर देश बलशाली आणि विकसित होईल. नवीन पिढीने निर्व्यसनी राहून देशाचे संस्कारदूत बनावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांच्या आगमनाने कुंभमेळ्याच्या कामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करून कुंभमेळ्यात गर्दीच्या नियोजनाबाबत त्यांनी सूचना केल्या.

युवराज होळकर म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी जलव्यवस्थापनाची सुरुवात नर्मदा येथे केली. जलसाक्षरता आणि जलव्यवस्थापन ही काळाची गरज आहे. गोदावरी आणि नर्मदेला जोडून 'एक भारत श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाणार आहे. गोदावरी महाराष्ट्राची तर नर्मदा मध्यप्रदेशची जीवनधारा आहे.

जन्मभूमी ते कर्मभूमी जलयात्रेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. अहिल्यादेवींनी सुरू केलेली फड पद्धती उपयुक्त असून ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते कुशावर्तातील जलकलश मुख्यमंत्री फडणवीस यांना सुपूर्द करण्यात आला आणि राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून आणून त्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. केदार कंठशिखर वयाच्या सहाव्या वर्षी सर करणाऱ्या चिमुकल्या मनकर्णिका देशपांडे हिचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. 'गोदा ते नर्मदा जलयात्रा २०२६' या गीताचे विमोचन आणि उन्नत नाशिक अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी विखे पाटील यांनी सपत्नीक १०८ कन्यकांचे पूजन केले.

कार्यक्रमाला माजी मंत्री रवींद्र चव्हाण, सदाभाऊ खोत, आमदार गोपीचंद पडळकर, राहुल आहेर, सीमा हिरे, देवयानी फरांदे, हिरामण खोसकर, दिलीप बनकर, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, मंत्री विखे पाटील यांच्या पत्नी शालिनीताई विखे पाटील, नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, ह.भ.प. संजय नाना धोंगडे, महंत उद्धव महाराज मंडलिक, मंदाकिनी मोरे, महामंडलेश्वर रामचंद्रदास मोरे, उपमहापौर विलास शिंदे आदी उपस्थित होते.

'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्या' अंतर्गत आयोजित या जलयात्रेचा मुख्य उद्देश राज्यातील जलस्त्रोतांबाबत जनजागृती करणे, लोकसहभाग वाढवणे आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा आहे. ही जलयात्रा २५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांतून प्रवास करणार आहे. यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि तरुण सहभागी झाले आहेत.

### जलयात्रेचा प्रवास असा राहील -

२५ एप्रिल :- त्र्यंबकेश्वर ते संगमनेर (मुक्काम : संगमनेर).

२६ एप्रिल :- संगमनेरमार्गे शिर्डी (मुक्काम : शिर्डी).

२७ एप्रिल :- कोपरगाव, वैजापूर, संभाजीनगर, घृष्णेश्वर (मुक्काम : घृष्णेश्वर).

२८ एप्रिल :- कन्नड, चाळीसगाव, धुळे (मुक्काम : धुळे).

२९ एप्रिल :- धुळे ते महेश्वर, मध्य प्रदेश (समारोप).

# थोडक्यात

## ठाण्यातील राबोडी येथून १६ वर्षीय मुलीचे अपहरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, ठाणे :** शहरातील राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात इसमाने अपहरण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून राबोडी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून पोलीस आता मुलीचा कसून शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, राबोडी परिसरातील सत्यनारायण बिल्डिंगमध्ये वास्तव्यास असणाऱ्या अनिता हरी आढायके यांची १६ वर्ष ९ महिने वयाची मुलगी 'साक्षी' ही दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७:०० ते ७:३० च्या सुमारास आपल्या राहत्या घरातून अचानक बेपत्ता झाली. कुटुंबियांनी तिचा सर्वत्र शोध घेतला, मात्र ती कोठेही मिळून आली नाही. अखेर या प्रकरणात कोणातरी अज्ञात इसमाने साक्षीला तिच्या पालकांच्या संमतीशिवाय कायदेशीर रखवालीतून फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

अपहृत मुलीचे वर्णन पाहता, साक्षीचा रंग गोरा असून तिची उंची साधारण ४ फूट आहे. तिचे नाक सरळ, चेहरा उभट आणि केस काळे व मध्यम स्वरूपाचे आहेत. शरीरयष्टीने मजबूत असलेल्या साक्षीने बेपत्ता झाली तेव्हा अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची नाईट पॅन्ट परिधान केली होती. या गंभीर घटनेची नोंद राबोडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १३७(२) अन्वये करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक आय.एम. शेख या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, या मुलीबाबत काहीही माहिती मिळाल्यास तातडीने राबोडी पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## आज नवी मुंबईत आंतराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा

### ऑलिम्पिक पदक विजेत्या मेरी कोम यांची उपस्थिती



**अक्षरात : जे.के.पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नेक्सस सीवूड मॉल, सेक्टर ४०, नेरूळ येथे दि.२६ एप्रिल २०२६ रोजी प्रथमच 'आयबीए ग्लोबल बॉक्सिंग सिरीज (IBA Global Boxing Series)' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन संध्या. ६ ते ९ वा. या वेळेत मरिन बॉक्सींग अॅकेडमी या बॉक्सिंग क्षेत्रातील नामांकित संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा विभागाचे सहकार्य या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी असणार असून यामध्ये जगभरातील नामांकित बॉक्सर सहभागी होणार आहेत. भारताच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या सुप्रसिद्ध बॉक्सर मेरी कोम यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमास लाभणार आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेचे आकर्षण अधिक वाढणार असून क्रीडा प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे नवी मुंबई शहराची स्मार्ट व स्पोर्ट्स सिटी अशी जागतिक स्तरावर ओळख मिळण्यास मदत होणार असून युवकांमध्ये क्रीडाविषयक प्रेरणा निर्माण करणारी ही स्पर्धा क्रीडाप्रेमींसाठी एक मोठी पर्वणी ठरणार आहे. तरी नागरिकांनी याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## प्राथमिक शाळेतील आठवणी अनमोल ठेवा - सुरेश डांगे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, चिमूर :** प्राथमिक शिक्षणाची जवळपास दहा वर्षे एकत्र घालवल्यानंतर पुढील शिक्षणासाठी इतरत्र जाताना मनात घालमेल असते.जुन्या आठवणी मनात रेंगाळत राहतात.शाळेतील दिवस आठवत राहतात. हा आठवणींचा ठेवा अनमोल असतो. विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात अभ्यास करून यश प्राप्त करावे आणि या अनमोल आठवणींना प्रगतीचे पंख द्यावे करावे असे प्रतिपादन लेखक सुरेश डांगे यांनी केले.चिमूर तालुक्यातील गदगाव केंद्रांतर्गत येत असलेल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सोनेगाव (बेगडे) येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि नव्याने दाखल होणाऱ्या पहिलीच्या विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय बुजाडे होते.उद्घाटन नगरसेवक रवी सावसाकडे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा हेमलता सातपुते, केंद्रप्रमुख ताराचंद दडमल, मुख्याध्यापक प्रफुल्ल बंडे,लेखक सुरेश डांगे, विजय निनावे, मारोती नन्नावरे, सुनील बुधे, सुनील गायकवाड, गोवर्धन ढोक, शुभांगी चौधरी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला पूजन करुन झाली. उपस्थित अतिथीनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत मोलाचे मार्गदर्शन केले. शाळेत नव्याने दाखल झालेल्या चिमुकल्यांचे पुष्पगुच्छ देऊन उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शालेय आठवणींना उजाळा दिला.

प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिनाला इंग्रजीतून प्रभावी भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपाध्यक्ष हेमलता सातपुते यांच्या वतीने नोटबुक व पेन बक्षीस देण्यात आले.निरोप घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रकाश कोडापे सहायक शिक्षक यांचेकडून त्यांच्या स्वतःच्या संघर्ष या स्वरचित काव्यसंग्रहाची भेट देण्यात आली .त्यांचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश कोडापे यांनी केले. सूत्रसंचालन अनुष्का नन्नावरे हिने केले तर उपस्थितांचे आभार शृती नन्नावरे हिने मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## संगमनेरच्या राजेंद्र गडगेची भोंदूगिरी अशोक खरात इतकीच भयानक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, संगमनेर :** नाशिक जिल्ह्यातील भोंदूबाबा अशोक खरातचं प्रकरण समोर आल्यानंतर आता आणखी एक एक भोंदूबाबा समोर येत आहे. मंत्रोच्चार करून आजार बरे करण्याचा दावा करणाऱ्या भोंदू राजेंद्र गडगे भोवती पोलिसांनी आता कारवाईचा फास आवळला आहे. या गडगेवर पोलिसांनी दत्ताधाम इथं कारवाई केली आहे. यावेळी २०० पेक्षा जास्त व्हिडीओ पोलिसांनी जप्त केले आहे. तसंच ९० पेक्षा अधिक औषधे सुद्धा पोलिसांनी जप्त केली आहे, या औषधांचा वापर कशासाठी होत होता, याचा शोध पोलीस घेत आहे.



संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील दत्तधाम सरकार नावाने भोंदू राजेंद्र गडगे हा दरबार भरवत होता. गेल्या कित्येक वर्षांपासून मंत्र तंत्राने दुर्धर आजार बरे करण्याचा त्याचा गोरखधंदा सुरू होता. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव रंजना गवांदे यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर हा भोंदू गजाआड गेला आहे. त्याच्या दरबारातून पोलीसांनी अनेक महत्वाचे पुरावे हस्तगत केले असून काही औषधाचे नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत. याने आजवर अनेकांचे आर्थिक, मानसिक आणी शारीरिक शोषण केले असून पिडीतांनी समोर यावं आणी गुन्हा दाखल करावा असं आवाहन अंनिसच्या राज्य सचिव रंजना गवांदे यांनी केलंय.

सरकार नावाने या भोंदूने आपला दरबार सुरू केला होता. राज्यभरातून हजारो लोक त्याच्या भोंदूगिरीचे बळी ठरले.

भोंदू राजेंद्र गडगे प्रकरणात पोलिसांनी कारवाईचा फास आवळला आहे. पोलिसांनी गडगेची सगळी कुंटली बाहेर काढली आहे. पोलिसांनी गडगेकडून आतापर्यंत २०० पेक्षा अधिक व्हिडीओ जप्त केले आहे. त्याचबरोरब नाशिक पोलिसांनी दत्तधाम येथून ९० पेक्षा अधिक औषधे जप्त केली असून वैद्यकीय तपासणीसाठी पाठवली आहे.

एवढंच नाहीतर गडगेकडून १३ प्रॉपर्टी खरेदीची माहितीही समोर आली आहे. याबद्दल सब-रजिस्ट्रार कार्यालयाकडून मालमत्तेची माहिती मागवली जाणार आहे. भोंदू गडगेकडे असलेल्या १० वेगवेगळ्या बँकांमधील खात्यांचा तपास सुरू आहे. तसंच 'पुत्र प्राप्ती' प्रकरणी ग्रामीण रुग्णालयाकडून भोंदू गडगेला नोटीस सुद्धा बजावली आहे, अशी माहिती अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी दिली.

## ठाण्याची मामलेदार मिसळ वास्तू झाली इतिहासजमा

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२५, ठाणे :** ठाणेकरांच्या खाद्य संस्कृतीचा ऐतिहासिक वारसा जोपासून समस्त ठाणेकरांच्या जिभेवर आधीराज्य करणारी तथा अनेक राजकीय आणि इतर क्षेत्रातील दिग्गजांच्या भेटीने सर्वत्र गाजलेली मामलेदार मिसळची जुनी वास्तू आता काळाच्या पडद्याआड जाऊन इतिहास जमा होणार आहे.



जवळजवळ ७० वर्षाहून अधिक काळ ठाणेकर खवय्यांना वेड लावणाऱ्या मामलेदार मिसळची वास्तू पुनर्विकासासाठी तोडण्यात आली आहे. तहसील कार्यालयाच्या पुनर्विकासामुळे ही प्रसिद्ध ठिकाण पाडण्यात आले असून ठाण्याच्या खाद्य संस्कृतीमधील एक सुंदर आठवण संपली असल्याने ठाणेकर हळहळत आहेत.साधारणता १९५० च्या दशकात सुरू झालेल्या या मिसळणे नेत्यांपासून ते अभिनेत्यांपर्यंत सर्वांनाच वेड लावले होते.म्हणूनच की काय आज ही वास्तू पाडल्यानंतर ठाण्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संचितातील एक महत्वाचा अध्याय संपल्याची भावना ठाण्यातील मिसळ प्रेमी व्यक्त करताना दिसत आहेत. पुनर्विकासाच्या निमित्ताने जरी ही मिसळ आता शेजारील दुसऱ्या वास्तूत स्थलांतरित झाली असली, तरी त्या जुन्या लाकडी बाकड्यांच्या आणि रांगांच्या आठवणी मात्र आता केवळ इतिहासात जमा झाल्या आहेत.

साधारणोने १९५० च्या दशकात सुरू झालेल्या या छोट्याशा हॉटेलचा प्रवास थक्क करणारा आहे. सरकारी कामासाठी तहसील कार्यालयात येणारे अधिकारी आणि मामलेदार यांच्या हक्काचे खाण्याचे ठिकाण म्हणून या दुकानाची ओळख निर्माण झाली आणि तिथूनच याला 'मामलेदार' हे नाव पडले. केवळ चवच नाही, तर या ठिकाणाने महाराष्ट्राच्या राजकारणातील अनेक स्थित्यंतरे जवळून पाहिली आहेत.

